बुधवार दि.३ जुलै २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३०४
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता
बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com


# पीएम किसान योजनेत राज्यात २० लाख ५० हजार लाभार्थींची वाढ

## कृषी मंत्री धनंजय मुंडे यांची सभागृहात मोठी घोषणा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)



केंद्र सरकारच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी असलेल्या पीएम किसान सन्मान योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दरवर्षी ६ हजार रुपये तर यावर्षीपासून राज्य शासनाने सुरू केलेल्या नमो शेतकरी महासन्मान योजनेतून ६ हजार रुपये असे एकूण १२ हजार रुपये शेतकऱ्यांना दिले जातात. या योजनेत चौदाव्या हप्त्यापर्यंत ७० लाख लाभार्थी राज्यातून लाभ घेत होते. कृषी विभागाने विविध मोहिमा राबवत गेल्या एक वर्षामध्ये या योजनेमध्ये २० लाख ५० हजार लाभार्थ्यांची वाढ करण्यात आली असल्याची माहिती आज एका लक्षवेधीच्या उत्तरादरम्यान कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे.

पी एम किसान योजनेत राज्यातील ६५ हजार शेतकरी काही कागदपत्रांच्या किंवा ई केवायसीच्या कारणावरून वंचित राहिल्या संदर्भात आमदार अभिमन्यू पवार यांसह विविध सदस्यांनी लक्षवेधी उपस्थित केली होती. या लक्षवेधीला कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी उत्तर देत संबंधित ६५ हजार शेतकऱ्यांचा परिपूर्ण प्रस्ताव केंद्र सरकारकडे मान्यतेसाठी सादर केलेला असून या प्रस्तावास शक्य तितक्या लवकर मान्यता मिळवून देण्यासाठी आपण स्वतः पाठपुरावा करणार असल्याचेही धनंजय मुंडे यांनी विधानसभेत सांगितले.दरम्यान या योजनेमध्ये आणखी पात्र असलेल्या लाभार्थ्यांची वाढ व्हावी याबाबत राज्यस्तरावरून तसेच केंद्र स्तरावरून विविध मोहिमा वेळोवेळी राबविण्यात येतील, असेही धनंजय मुंडे यांनी सांगितले. तसेच डेटा एन्ट्री करणाऱ्या व्यक्तींसाठी स्वतंत्र लॅपटॉप देणार असल्याचीही घोषणा धनंजय मुंडे यांनी यावेळी विधानसभेत बोलताना केली. आ.अभिमन्यू पवार यांसह आ.प्रकाश आबिटकर, आ. बच्चू कडू, आ.श्वेताताई महाले यांसह आदी सदस्यांनी आपले प्रश्न उपस्थित केले होते.

# पंकजा मुंडेंनी दाखल केला विधान परिषदेसाठी उमेदवारी अर्ज

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)



भारतीय जनता पक्षाच्या नेत्या पंकजा मुंडे यांनी विधान परिषदेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. २०१४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांचा पराभव झाला होता. तेव्हापासून पंकजा मुंडे यांच्या पुनर्वसनचा प्रश्न चर्चेत होता. मात्र, भारतीय जनता पक्षाच्या वतीने त्यांना विधान परिषद किंवा राज्यसभेचे संधी देण्यात आली नाही. अखेर २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र, येथे देखील त्यांचा पराभव झाला. त्यामुळे आता पंकजा मुंडे यांचे पुनर्वसन कधी? असा प्रश्न उपस्थित होत होता. अखेर विधान परिषदेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या वतीने त्यांना उमेदवारी देण्यात आली असून त्यांचा विधान परिषदेमध्ये जाण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

पंकजा मुंडे यांनी विधान परिषदेवर वर्णी लागताच आता त्यांच्या मंत्रीमंडळात समावेशाची चर्चा सुरू झाली आहे. पावसाळी अधिवेशन संपताच राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यात पंकजा मुंडे यांना स्थान मिळू शकते. २०१४ पूर्वी भारतीय जनता पक्षाच्या सरकारमध्ये देखील पंकजा मुंडे यांच्याकडे मंत्री पद होते. तसेच त्या बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री देखील होत्या. मात्र त्यानंतर झालेल्या पराभवानंतर त्यांना एकही संधी मिळाली नाही. आता त्यांना पुन्हा एकदा मंत्रीपद मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# शहीद संजय ताकतोडे यांच्या कुटुंबीयांचे उपोषण

## शासकीय नोकरीत सामावून घेण्याची मागणी




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

मातंग आरक्षण वर्गीकरण हुतात्मा शहीद संजय ताकतोडे यांच्या कुटुंबीयांनी,कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरीत सामावून घेण्यात यावे यामागणीसाठी मंगळवार (दि.२) रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एकदिवसीय लाक्षणिक उपोषण केले.

मातंग समाज आरक्षण वर्गीकरण हुतात्मा शहिद संजय ज्ञानोबा ताकतोडे यांनी दि.०५/०३/२०१९ रोजी मातंग समाजाला अ,ब,क,ड वर्गवारी नुसार स्वतंत्र आरक्षण दण्यात यावे या मागणीसाठी बीड तालुक्यातील बिंदुसरा प्रकल्पात जलसमाधी घेतली होती.त्यानंतर सकल मातंग समाजाच्या वतीने, विविध मागण्या शासनाकडून मान्य करण्यात याव्या याकरिता शहीद संजय ज्ञानोबा ताकतोडे याच्या पार्थिवावर,जोपर्यंत शासन स्तरावरुन केलेल्या मागण्या मान्य होत नाहीत.तोपर्यंत अंत्यसंस्कार करणार नाहीत अशी भूमीका घेत ठिय्या आंदोलन केले होते.सदरोल मागण्यांमध्ये प्रामुख्याने शहीद संजय ज्ञानोबा ताकतोडे यांच्या कुटुंबातील एका सदस्यास शासकाय नौकरी देवुन पुनर्वसन करावे या मागणीचा प्रामुख्याने समावेश होता. तद्नंतर तात्कालीन मा.मुख्यमंत्री,मा.पालकमंत्री यांच्याकडून मा.जिल्हाधिकारी बीड यांचे मार्फत आमच्या मागण्या मान्य कल्या जातील असे लेखी स्वरुपात आश्वासीत करण्यात आले होते.परंतु आजतायगत शहीद संजय ताकतोडे यांच्या कुटुंबातील सदस्यास शासकीय नोकरीत सामावुन घेतले नाही अथवा याबाबत कसलीही कार्यवाही झाली नाही.त्यामुळे शहिद संजय ताकतोडे यांचे आई-वडील सौ.फुलाबाई ज्ञानोबा ताकतोडे व ज्ञानोबा ताकतोडे हे मंगळवारी (दि.२) रोजी बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण करीत आहेत.

# क्षिरसागर यांचे समर्पण आणि त्याग मोलाचा : रावसाहेब म्हस्के

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे



रयत सेवकाची रयतनिष्ठा व विद्यार्थीनिष्ठा हा जीवनातील अनमोल ठेवा आहे.विद्यार्थी घडविण्यात आणि शाखेची गुणवत्ता वाढविण्यात शिक्षकांचे अथक परिश्रम आहे.याच परिश्रमाचा परिपाक म्हणजे क्षिरसागर यांचे समर्पण आणि त्याग मोलाचा आहे,असे प्रतिपादन जनरल बॉडी सदस्य रावसाहेब म्हस्के यांनी केले.

प्रवरानगर येथील महात्मा गांधी शैक्षणिक संकुलात कनिष्ठ विभागातील मेकॅनिकल विषयाचे निदेशक राजेंद्रकुमार क्षिरसागर यांच्या सेवापूर्ती समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनरल बॉडी सदस्य रावसाहेब म्हस्के हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सहसचिव संजय नागपुरे,माजी प्राचार्य अण्णासाहेब साबळे व माजी नगराध्यक्ष बंडू पैलवान क्षिरसागर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख पाहुणे व अध्यक्ष यांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य अंगद काकडे यांनी केले. यावेळी मुख्याध्यापिका सिंधू क्षेत्रे, मुख्याध्यापक राजेंद्र बडे,मधुकर अनाप, व्ही.टी.गायकवाड, चंदूभाई तांबोळी, रतिलाल भंडारी, नारायण जाधव,रामचंद्र डोळे,गोरक्षनाथ फटांगरे,के.डी. भगत, नानासाहेब गांगड,संपत तांबे, नंदकुमार मोरे, प्रशांत पाटील, हरिभाऊ चौधरी,भागवत कुटे,सुभाष भुसाळ,संजय ठाकरे,बाबासाहेब अंत्रे,प्राचार्य बाळासाहेब अंबाडे,आई विमल क्षिरसागर,मुलगी शिवानी क्षिरसागर,अशोक निंबाडे, संजीवनी आंधळे,तळपाडे, काळे,नळे यांच्यासह अनेक आजी-माजी शिक्षक, मुख्याध्यापक, नातेवाईक उपस्थित होते.याप्रसंगी राजेंद्रकुमार क्षिरसागर उभयतांचा शाखेच्यावतीने मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शाखेच्यावतीने देण्यात येणाऱ्या मानपत्राचे वाचन रेणुका वर्पे यांनी केले.यावेळी नितीन हुसळे, गोरक्षनाथ बनकर,साधना घोगरे, मुलगा आदित्य क्षिरसागर,बंडू क्षिरसागर,छाया क्षिरसागर, प्रियंका काखी,अजय भांडीक, संगीता वाव्हळ,तेजस भोसले, पत्नी सीमा क्षिरसागर, राजेंद्रकुमार क्षिरसागर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संजय नागपुरे यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थी घडविण्यात शिक्षकांचे परिश्रम आणि ध्यास महत्त्वाचा असून जीवनाचा तोच सर्वोच्च आनंद असल्याचे मत व्यक्त केले. आणि क्षिरसागर कुटुंबीयांना शुभेच्छा दिल्या.अध्यक्षीय भाषणातून रावसाहेब म्हस्के यांनी रयत ही त्यागातून उभी राहिलेली संस्था असून विद्यार्थी घडविण्यात शिक्षकांचे जीवन समर्पित आहे, असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिभा ठोकळ, अश्विनी सोहोनी यांनी केले,तर शेवटी उपप्राचार्या अलका आहेर यांनी आभार मानले.

# दोन कुंटुंबातील सदस्य वाहून गेल्यानंतर लोणावळा प्रशासनाला जाग

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

पुणे (वृत्तसंस्था)

लोणावळ्यातील पर्यटकांची गर्दी वाढल्यानंतर झालेल्या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन लोणावळा नगर परिषद आणि पुणे रेल्वे प्रशासनाच्या वतीने या परिसरातील अतिक्रणे हटवण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोन कुंटुबातील सदस्य वाहून गेल्यानंतर या प्रकरणाची गंभीर दखल घेत, या परिसरात संध्याकाळी ६ नंतर संचारबंदी लागू करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर प्रशासन खडबडून जागे झाले असून अतिक्रण हटवण्यात आली.पुणे आणि परिसरातील नागरिकांना भटकंतीसाठी भुशी धरण आणि परिसराला सर्वाधिक पसंती असल्याचे दिसून येते. त्यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात चहा, नाष्टा, भजी, कणीस आदी विक्रेत्यांनी दुकाने थाटली होती. आलेल्या पर्यकटकांनाही त्यामुळे खाण्या-पिण्याची व्यवस्था होत होती. मात्र, पाण्याच्या प्रवाहात दोन कुंटुबातील व्यक्ती वाहून गेल्यानंतर हा प्रश्न ऐरणीवर आला होता. अखेर प्रशासनाने कारवाई करत येथील सर्व दुकाने हटवली. भविष्यात अन्सारी आणि सय्यद कुटुंबियांसारखी दुर्घटना घडू नये आणि त्याला ही अतिक्रमणे जबाबदार ठरू नयेत, म्हणून प्रशासनाने तातडीने हा निर्णय घेतला आहे. लोणावळा नगरपरिषद आणि पुणे रेल्वे मंडळ प्रशासनाने ही संयुक्त कारवाई केली आहे. मात्र, दोन कुटुंब वाहून गेल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी कठोर कारवाईचे आदेश दिले होते. त्यानंतर झोपलेल्या प्रशासनाला जाग आली आहे.

# निवडणुकांमुळे त्यांना लाडकी बहीण भाऊ आठवतात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

निवडणुका आल्यामुळे सध्या त्यांना लाडकी बहीण-भाऊ हे सगळे आठवू लागले आहेत असा टोला राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना लगावला आहे. सुप्रिया सुळे यांनी सदानंद सुळे यांच्यासह रविवारी तुकाराम महाराजांच्या पालखीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला आहे. मंगलमय वातावरणामध्ये पालखीचे पुण्यात आगमन होत आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पाऊस पडू दे आणि अडचणीत आलेला बळीराजाला न्याय मिळू दे असे साकडं विठुरायाला घातल्याचे सुप्रिया सुळे यांनी सांगितले.

## चारोळी

मेघांची पालखी
घेऊनी जाता भोयी
नयनांच्या डोहात नजारा टीपण्या
आतुरले चातक हळुवार साद देई.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लाभार्थ्यांकडून कागदपत्राची जुळवा-जुळव

## महिन्याला १५०० रुपये पाहिजेत ना ? मग ३१ ऑगस्ट पर्यत अर्ज करा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार । धोंडीबा मुंडे

राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लागू करण्यात आली,असून त्याबाबत शासन आदेश प्राप्त झाला आहे. त्यात महाराष्ट्रातील दि.३१ ऑगस्ट २०२४ या कालावधीत अर्ज करायचे वय २१ ते ६५ वर्ष वयोगटातील विवाहित, विधवा,घटस्फोटित,परित्यक्त्या आणि निराधार महिलांना लाभ मिळणार आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी महिलेचे आधार कार्ड, महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी प्रमाणपत्र, महाराष्ट्रातील जन्म दाखला.सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला कुटुंब प्रमुखाचा उत्पन्नाचा दाखला.बँक खाते पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत.पासफोटो शिधा पत्रिका (रेशन कार्ड) योजनेच्या अटी शर्तींचे पालन करण्याबद्दलचे हमीपत्र द्यावे लागेल,महिला लाभार्थी कागदपत्राची जुळवा जुळव करीत असून काहींनी दुसऱ्या दिवशी कंधार सेतू सुविधा केंद्रावर अर्ज भरताना मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती,

राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्प सादर करताना महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य,स्वावलंबन,सर्वांगीण विकासाच्या हेतूने राज्यात दि.१ जुलैपासून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबविण्यात येणार असल्याचे घोषित केले.या योजनेनुसार २१ ते ६५ वय असलेल्या महिलांच्या बँक खात्यात राज्य सरकारकडून दरमहा १५०० रुपये जमा केले जाणार आहेत.यासाठी संबंधीत महिलेचे वार्षिक उत्पन्न २ लाख ५० हजार रुपयांच्या आत असणे आवश्यक आहे.




### माझी लाडकी बहीण योजनेचे निकष

लाभार्थी महिला महाराष्ट्र राज्याची रहिवासी असणे आवश्यक आहे. राज्यातील विवाहित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या आणि निराधार महिला.दिनांक १ ते ३१ ऑगस्ट २०२४ या कालावधीत अर्ज करायचे असल्याने कमीत कमी २१ वर्ष ते जास्तीत जास्त ६५ वर्ष पूर्ण होईपर्यंत अर्ज करता येणार.या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करणाऱ्या लाभार्थी महिलेचे बँकेत खाते असणे आवश्यक आहे. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख म्हणजे अडीच लाखापेक्षा जास्त नसावे.

# पिण्याच्या पाण्याचा विहिरीचा रस्ता द्या;मोहदरी येथील ग्रामस्थांची निवेदनाद्वारे प्रशासनाला मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम रजा**

शहराप्रमाणे ग्रामीण भागातही अतिक्रमनाचे प्रमाण वाढले आहे. यामुळे शेती, पाणी आणि इतर गोष्टीसाठी जाण्यास गावकर्यांना नाहक त्रास होताना दिसून येत आहे.याबाबत सविस्तर वृत्त असे की मोहदरी येथील पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्रोत असणाऱ्या डोबाड्या विहिरी चा रस्ता गेल्या अनेक दिवसापासून बंद करण्यात आला परंतु ग्रामपंचायत ने जुना आणि मुख्य रस्त्याचे अतिक्रमण काढण्यासाठी न्यायालयात प्रकरण दाखल केल आहे त्या प्रकरणाचा निकाल हा ग्रामपंचायत च्या बाजूने लागला परंतु ग्रामपंचायत ने अतिक्रमण काढण्याच्या अगोदरच समोरील व्यक्तीने जिल्हा सत्र न्यायालय पुसद येथे अपील केली आहे याबाबत २२ जुलै ला पुसद येथे सुनावणी आहे परंतु गवातील लोकांना आता पिण्याच्या पाण्याची गरज आहे.

यावर तोडगा काय निघणार लोकांना हापसी, बोर यांचं पाणी पियाला लगात आहे त्यामुळे लहान बाळासहीत मोठ्या व्यक्तीचे पण आरोग्य धोक्यात आले आहे.न्यायालयाचा निकाल लवकर लागणार नाही परंतु गावकर्यांची हेळसांड थांबली पाहिजे २१ व्या शतकात पिण्याच्या पाण्यासाठी हक्कासाठी न्याय मागण्याची वेळ आज मोहदरी वासियांवर आली आहे ही शोकांतिका आहे.यामुळे मोहदरी येथील महिला पुरुष आपल्या मुलाबाळासोबत तहसील कार्यालयावर धडकले.

तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांनी रस्त्याच्या समस्यावर तात्काळ उपाययोजन करू असे अश्वासन मोहदरी येथील नागरिकांना दिले यावेळी पुंजाबाई खोकले, शंकर डाखोरे, आनंद श्रावणे, सुदाम दांडेगावकर, राजु कांबळे, विठ्ठल पवार, राहुल धुळे, काशिनाथ डाखोरे, दादाराव डाखोरे, अनिल आवटे, बाबुराव सावंगडे, राजु गव्हाणे, गजानन गव्हाने, कुंडलिक गव्हाणे, माधव धुळे, सतीश डाखोरे, शिवराम वाणी, किशोर धुळे, संजय वाणी, शामराव गव्हाणे, शिवाजी गव्हाण, मारोती गव्हाणे, शिवाजी महाजन, भीमराव भालेराव, शोभाबाई सूत्रधार धुळे, कविताबाई हनवते, कांताबाई भालेराव, अनुसया बाई हनवते, मंजुळाबाई कोळेकर, इंदुबाई धुळे, आशाबाई धुळे, सोमीत्राबाई भीमराव गव्हाणे, धोंडाबाई गव्हाणे, शकुंतला बाई मोहिते, सविताबाई गव्हाणे, शेशिकला पवार, विमलबाई पोटे, कोंडाबाई गुवाडे, मंगल कांबळे, पंचांबाई धनगर, जनाबाई राघोजी गाव्हणे, सगुणाबाई आढाव, सुमनबाई वाणी, गिरजाबाई मोरे, बेबीबाई धुळे, राधाबाई कांबळे, गोदावरी बाई धुळे,मारोती गव्हाणे, विनायक गव्हाणे, बालाजी गव्हाणे, प्रकाश गायकवाड, भगवान श्रावणे, पवन गुव्हाडे, मारोती हनवते सोबतच सामाजिक कार्यकर्ते साहेबराव कांबळे, सरोजताई देशमुख, बबलू जाधव सह शेकडो मोहदरीकर पिण्याच्या पाण्यासाठी तहसील कार्यालय उमरखेड येथे उपस्थित होते.





**जुई धरण येथे विपुल वृष्टी होऊन पाणी यावे यासाठी वरून देवाचे पूजन करण्यात आले यावेळी स्वराज्य पक्षाचे जिल्हाध्यक्ष विकास भाऊ देशमुख, शिवसेना उपजिल्हाप्रमुख मनीष श्रीवास्तव, शहर प्रमुख महेश पुरोहित, डॉक्टर संजय पगारे, मराठा सेवक, सुरेश पाटील तळेकर, नितीन साळवे, पुरोहित्य आचार्य विपिन जोशी यांनी केले, छायाचित्र राम शिंदे.**

# नायगव्हाण येथे कृषिदिनानिमित्त कृषिदूतांचे वृक्षारोपण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तांडा येथील श्री धनेश्वरी कृषी महाविद्यालयाच्या अंतिम वर्षातील कृषीदुत हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त कृषीदिन साजरा करत वृक्षारोपन केले.

विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आशिष वैद्य, प्रशासकीय अधिकारी रमेश भालकर, कार्यक्रम अधिकारी प्रा. एन. आर. सोनोने, प्रा. ए एस पाचपोर, कार्यक्रम समन्वयक. आर.शामकुवार आणि विषयतज्ज्ञ डॉ. आर. के. डिग्रसकर, यांचे मार्गदर्शन लाभले.वृक्षारोपणाच्या वेळी नायगव्हाण गावाचे सरपंच श्री. राजु साबळे ,व ग्रामस्त आणि शेतकरी व जिल्हा परिषद शाळाचे मुख्याध्यापिका व शिक्षक उपस्थिती लाभली.या कार्यक्रमासाठी कृषीदूत. ऋषी निकम, अजय पवार, हर्षल पाळोदकर, रोहित नाईक, विश्वजीत नालमे, आकाश पवार, संदेश पेंटेवाड, , ऋषिकेश पाडोळ, शुभम पदर, नागेश पाटक आदींचा समावेश आहे.यांनी विशेष परिश्रमघेतले.




# जि.प.प्रा.शाळा संगम येथे शिक्षक पालक मेळावा उत्साहात संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

परळी तालुक्यातील जि प प्रा शा संगम शाळेत आज दि २९ जून २४ रोजी शिक्षक पालक मेळावा नुतन परळी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री यादव पल्लेवाड,ह भ प रामेश्वर महाराज कोकाटे,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष नवनाथ नागरगोजे ,मुख्याध्यापक अशोक नावंदे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

उपस्थित मान्यवर व पालकांचे स्वागत शाळेच्या वतीने करण्यात आले.प्रास्तविक मुख्याध्यापक अशोक नावंदे यांनी करताना बैठकीच्या आयोजना बाबत व विध्यार्थी लाभाच्या योजना बद्दल माहिती सांगितली .केंद्रप्रमुख श्री पल्लेवाड यांनी शाळेच्या विकासासाठी पालकांची भूमिका महत्त्वाची आहे असे सांगितले व विध्यार्थी विविध शिष्यवृत्ती योजना बाबतची माहिती सांगून असाक्षर पुरुष,महिलांना साक्षर करण्याची जबाबदारी शाळा मुख्याध्यापक,शिक्षक यांच्यासह कुटुंबातील सदस्य यांनी घेऊन सप्टेंबर अखेर सर्वांना साक्षर करावे असे आवाहन केले.पालकांच्या वतीने ह भ प रामेश्वर महाराज कोकाटे यांनी शाळेला सर्वोत्तपरी सहकार्य करण्याचे व असाक्षरांना वही, पेन व उजळणी पुस्तक वाटप करण्याचा मनोदय व्यक्त करून शाळेत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. यावेळी पालक मोठया संख्येने उपस्थित होते. मेळावा यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षक सर्वश्री महादेव गित्ते सर ,सुभाष कोंकेवाड सर,शिक्षिका श्रीमती कल्पना बडे मॅडम व बबिता शिंदे मॅडम यांनी परिश्रम घेतले.




# पिंपरनई येथील गणेश नगर वस्ती वरील ग्रामस्थांची चिखलातुन पायपीट; मातोश्री पाणंद रस्ते योजना ठरतेय मृगजळ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

लिंबागणेश ग्रामीण भागात शेतवस्तीवर जाण्यासाठी दळणवळणाची साधने व मजुरांच्या हाताला काम मिळावे या उदात्त हेतूने मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना अस्तित्वात आली मात्र पावसाळा सुरू होण्यापूर्वी रस्ते काम पूर्ण होणे अपेक्षित असताना पावसाळा सुरू होऊन सुद्धा शासकीय नियमांच्या कचाट्यात योजना सापडली असून प्रसिद्धी माध्यमांद्वारे गाजावाजा करण्यात आलेल्या योजनेचे वास्तव मात्र क्लेशदायक असुन अखेर काही गावांमध्ये ग्रामस्थांनी स्वखर्चाने रस्ते काम करण्यास सुरुवात केली असुन ग्रामस्थांमध्ये तिव्र भावना उमटत आहेत. बीड तालुक्यातील पिंपरनई येथील गणेशनगर वस्तीवरील ग्रामस्थांना मुलांच्या शाळा, बाजारहाट, दवाखाना आदि कामांसाठी सध्या पावसाळ्यात चिखल तुडवीत जावे लागत असल्याने शासनाप्रती तिव्र नाराजी दिसून येत आहे.

बीड तालुक्यातील मौजे.पिंपरनई ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत गणेशनगर वस्ती २५ वर्षांपासून वास्तव्यास असुन असुन २५-३० घरांचा उंबरठा असलेली १५० च्या जवळपास लोकसंख्या गावापासून १ किलोमीटर अंतरावर असुन रस्ता नसल्याने शालेय मुलांची शाळा,दुधदुभते, भाजीपाला,किराणा, बाजारहाट आदि कामांसाठी पावसाळ्यात गुडघाभर चिखल तुडवीत जावं लागतं.२५ वर्षांपासूनचा आमचा वनवास कधी फिरतोय माहीत नाही अशी उद्विग्न प्रतिक्रिया सरस्वती वायभट यांनी डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलताना दिली.पिंपरनई ग्रुप ग्रामपंचायत असुन गणेश नगर वस्तीवरील मी विद्यमान



ग्रामपंचायत सदस्य असुन दिड वर्षांपासून शासन दरबारी कागदपत्रे घेऊन पाठपुरावा केला आहे. ग्रामसेवक यांनी उन्हाळ्यात रस्तेकामासाठी ईस्टीमेट तयार केले असल्याचे सांगतात मात्र रस्त्याचे काम अजूनही सुरू नाही.तातडीने रस्ताकाम सुरू न झाल्यास आम्ही रास्तारोको आंदोलन करणार आहोत.शासनामार्फत मातोश्री पाणंद रस्ते योजनेंतर्गत मराठवाड्यातील ८ जिल्ह्यातुन ९३५० कामे प्रस्तावित असुन मराठवाड्यात २०७३ कामे मंजूर करण्यात आली आहेत त्यापैकी केवळ ६७४ कामांनाच प्रशासकीय मान्यता मिळालेली असुन ६३८ कामांची स्थळ पाहणी करण्यात आलेली आहे.त्यापैकी ५८६ कामांनाच कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.शासनाने मंजुरी दिलेल्या २०७४ कामांपैकी केवळ ४८४ कामेच म्हणजे २३ टक्केच कामे पूर्ण झाल्यामुळे ग्रामीण भागात ही योजना मृगजळ ठरू पहात आहे.त्यामुळे ग्रामीण भागातील शाळा,दुधदुभते, भाजीपाला, बाजारहाट, शेतमाल वाहतुकीचा प्रश्न प्रलंबित आहे.दरवर्षी पेरणीसाठी बि -बियाणे नेताना त्याचबरोबर पिक काढणीनंतर शेतीमाल वाहतुकीसाठी रस्ता नसल्याने शेतक-यांची अडचण होत असुन प्रलंबित पाणंद रस्ता कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत.

## कै.वामनराव शिंदे साहेब आदर्श विद्यालय सांगोला प्रशालेतील सर्व विद्यार्थ्यांना

# शैक्षणिक साहित्य वाटप करून मा.बापूसाहेब ठोकळे सरांनी केला वाढदिवस साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

कै.वामनराव शिंदे साहेब आदर्श विद्यालय सांगोला प्रशालेतील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून मा.बापूसाहेब ठोकळे सरांनी केला वाढदिवस साजरा सांगोला तालुक्यातील बहुजनांचे झुंजार नेते, सामाजिक कार्यातील अग्रगण्य नेतृत्व मा. बापूसाहेब ठोकळे सर यांनी त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून प्रशालेतील सर्व गरजू गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून अनोख्या पद्धतीने वाढदिवससाजरा करण्यात आला. बापूसाहेबांनी एक नवीन विचार समाजामध्ये पेरलेला आहे. समाजातील अतिशय सामान्य लोकांसाठी तना-मनापासून काहीतरी करण्याची त्यांची एक तळमळ यामधून दिसून येते. बापूसाहेबांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. एवढेच नव्हे तर त्यांच्या या विचाराने प्रेरित होऊन समाजातील अनेकांनी एकत्र येऊन त्यांची ही विचारधारा अशीच पुढे प्रवाहित केल्यास एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही, असा विश्वास प्रशालेचे मुख्याध्यापक रमेश पवार यांनी व्यक्त केला.

# शेतकऱ्यांनी एक रुपयात पिक विमा योजनेत सहभागी व्हावे;उपविभागीय अधिकारी मुळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहिमराज**

खरीप २०२४ हंगामात पेरण्या सुरु झाल्या असून, जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी ज्वारी, तूर, मूग, उडीद, सोयाबीन आणि कापूस या पिकांसाठी एक रुपयात प्रधानमंत्री विमा योजनेत सहभागी होऊन पिकांना विम्याचे संरक्षण करून घेण्याचे आवाहन उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांनी केले आहे.प्रधानमंत्री पिक विमा योजनेत शेतकऱ्यांना एक रुपया विमा हप्ता भरून सहभागी करून घेण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने २०२३ मध्ये घेतला आहे. विविध नैसर्गिक आपत्तींमुळे पिकाच्या होणाऱ्या नुकसानीपासून शेतकऱ्यास आर्थिक स्थैर्य अबाधित राखण्याच्या दृष्टिकोनातून योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी केंद्र शासनाचे पिक विमा पोर्टल (्र.ाषिलू.सेौं.ळप) सुरु करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी फक्त एक रुपया भरून आपल्या पिकांना पिक विम्याचे संरक्षण घ्यावे, असे आवाहन केले आहे.

विमा अर्ज भरण्यासाठी प्रति शेतकरी सीएससी केंद्रास ४० रुपये मानधन केंद्र शासनाने निर्धारित करून दिले आहे. ते संबंधित विमा कंपनीमार्फत सीएससी केंद्रास दिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांनी प्रति अर्ज एक रुपया प्रमाणे रक्कम सीएससी केंद्र चालकांना देऊन अर्ज करावा. केंद्रचालकांनी अतिरिक्त रक्कमेची मागणी केल्यास शेतकऱ्यांनी तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे संपर्क केल्यास केंद्रचालकावर कायदेशीर कारवाई करता येईल. कोणत्याही सीएससी केंद्र चालकाने अथवा शेतकऱ्याने शासकीय जमीन, शासकीय गायरान, मंदिर, देवस्थान, संस्थान जमीन अथवा दुसऱ्या शेतकऱ्याचा परस्पर पिक विमा उतरवू नये, अशा तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे उपविभागीय अधिकारी यांनी कळविले आहे.

**शेतकऱ्यांनी विमा काढताना ही काळजी घ्यावी**

अर्ज करण्यासाठी आधार क्रमांक आवश्यक आहे. पिक विम्यातील अर्ज हा आधार वरील नावाप्रमाणेच असावा. पिक विम्यातील नुकसान भरपाई ही केंद्र शासनाच्या विमा पोर्टल द्वारे आधार संलग्न बँक खात्यामध्ये करण्यात येते. यासाठी आपले बँक खाते आधार संलग्न पेमेंट मिळण्यासाठी अधिकृत असणे आवश्यक आहे. याकरिता आपला बँक मॅनेजर माहिती देऊ शकतो. आधार कार्ड वरील नाव व बँक खात्यावरील नाव सारखे असावे.

**विमा योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्याने हे करावे**

अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी पिक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना विमा योजनेत सहभाग बंधनकारक नाही. त्यासाठी अंतिम दिनांकाच्या ७ दिवस अगोदर कर्ज घेतलेल्या बँकेमध्ये अर्ज देणे आवश्यक (अनिवार्य) आहे. इतर बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी आपला सातबाराचा उतारा, बँक पासबुक, आधारकार्ड, पिकपेराचे स्वयं घोषणापत्र व आवश्यक ठिकाणी नोंदणीकृत भाडेपत्रक-कारारनामा अपलोड करावा. योजनेत सहभागी होण्यासाठी आपण प्राधिकृत बँक, कॉमन सर्विस सेंटर अथवा www.pmfby.gov.in या पोर्टलचे सहाय्य घेता येईल.योजनेत सहभागासाठी अंतिम मुदत दि.१५ जुलै २०२४ आहे. परंतु, सर्व शेतकऱ्यांनी अंतिम दिनांकाची वाट न पाहता आपल्या पिकाचा पिक विमा उतरवून घ्यावा. मिळण्यासाठी अधिकृत असणे आवश्यक आहे. याकरिता बँक व्यवस्थापक माहिती देऊ शकतो. योजनेच्या अधिक माहितीसाठी केंद्र शासनाचे कृषि रक्षक पोर्टल हेल्पलाईन १४४४७ संबंधित विमा कंपनी, स्थानिक कृषि विभाग कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांनी केले आहे.

## क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

# ना.संजय बनसोडे यांच्यावर गुलाबपुष्पवृष्टी करुन ४० फुटाचा हार घालुन जंगी स्वागत





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर | सुनिल बस्वराज हावा**

उदगीर मतदार संघाचा सर्वांगीण विकास करून सबंध महाराष्ट्रात 'उदगीर मतदार संघाचे विकासाचे मॉडेल' म्हणून ओळख निर्माण करणारे या भागाचे आमदार तथा महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांचा १ जुलै रोजी उदगीर तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांच्या वतीने वाढदिवस साजरा करण्यात आला.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज चौकात क्रीडामंत्री संजय बनसोडे यांच्यावर पुष्पवृष्टी करुन फटाक्यांच्या आतिषबाजीमध्ये ४० फुटाचा हार ना.संजय बनसोडे यांना घालुन भव्य - दिव्य सत्कार करुन केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला.

ना.संजय बनसोडे यांच्या वाढदिवसानिमित्त, उदगीर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये सकाळी ७ वाजता श्री उदागिर बाबा महाराज किल्ला येथे अभिषेक, हजरत ख्वाजा बादशाह दर्गा येथे चादर चढवणे, कामगार बांधवांना खिचडी वाटप, उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळे वाटप, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर गार्डन येथे वृक्षारोपण आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी माजी सभापती सिद्धेश्वर पाटील,खरेदी विक्री संघाचे चेअरमन भरत चामले, राष्ट्रवादीचे नेते प्रा.श्याम डावळे,तालुकाध्यक्ष बालाजी भोसले,शहराध्यक्ष सय्यद जानीभाई,माजी नगरसेवक अनिल मुदाळे, माजी नगरसेवक फय्याज शेख, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष नवनाथ गायकवाड, इब्राहिम देवर्जनकर, काँग्रेसचे युवा नेते कुणाल बागबंदे, अतनूरचे सरपंच चंद्रशेखर पाटील अतनूरकर,मादलापूरचे सरपंच उदय मुंडकर, अशोक कांबळे, राजकुमार गंडारे , सतिश कांबळे, तोंडचिरकर,बाळासाहेब नवाडे, सतिश पाटील माकणीकर, सुनिल केंद्रे,राजकुमार चव्हाण,बाळु सगर, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष शफी हाशमी,यांच्यासह शेकडो कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# पुणे-सोलापूर महामार्गावर भिषण अपघात पाच जणांचा जागीच मृत्यू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर | बबनराव धायतोंडे**



पुणे - सोलापूर महामार्गावर डाळज नं. ३ (ता. इंदापूर) ग्रामपंचायतच्या हद्दीत चारचाकी चालकाचा ताबा सुटून झालेल्या अपघातात फिरण्यासाठी गेलेल्या पाच जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर एकजण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. मंगळवार (ता.०२) सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास हि घटना घडली. हे सर्वजण तेलंगणा राज्यातील असल्याची माहिती मिळतअसून हा अपघात एवढा भिषण होता की, चारचाकी गाडीने तिन चार पलटच्या मारल्याची माहिती उपस्थित असलेल्या नागरिकांनी दिली.

गाडी मधील अपघातात रफिक कुरेशी (वय ३४), इरफान पटेल (वय २४), मेहबूब कुरेशी (वय- २४) फिरोज कुरेशी (वय २८) फिरोज कुरेशी (वय २७) (सर्व रा.नारायनखेड,ता, जि-मेडक, तेलंगणा) अशी अपघातात मृत्यू झालेल्या पाच जणांची नावे आहेत. तर सय्यद इस्माईल अमीर (वय २३) हा तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावरती भिगवण या ठिकाणी उपचार सुरू आहेत.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, तेलंगणा राज्यातील नारायनखेड(जिल्हा-मेडक) या गावातील ६ तरुण मुंबई येथे बलेनो गाडी मधून फिरायला गेले होते. मुंबई फिरून झाल्यानंतर परत आपल्या नारायणखेड या गावी पुणे - सोलापूर या राष्ट्रीय महामार्गावरून परत निघाले असताना दुपारी चालू आलेल्या जोरदार पाऊसामुळे डाळज नंबर:- ३ च्या हद्दीतील सुजाता पेट्रोल पंपाच्या समोर रस्त्यालगत साचलेल्या पाण्याच्या खड्डयाचा अंदाज न आल्याने वेगाने असणारी बलेनो कार खड्ड्यात जोरात आदळली.

कार खड्ड्यात आदळल्याने चालकाचे गाडी वरील नियंत्रण सुटले व गाडीने तब्बल तिन ते चार पलटच्या मारल्या. यामध्ये गाडीत असलेले पाच जणांचा जागीच मृत्यू झाला तर एकावर भिगवण येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.अपघाताची माहिती मिळताच आपुलकीची सेवा म्बुलन्सचे संचालक केतन वाघ यांनी सर्व जखमींना भिगवण या ठिकाणी पुढील उपचारासाठी भिगवण आय.सी.यु या दवाखान्यात आणण्यात आले परंतु त्यातील पाच तरुणांना डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. तर गंभीर जखमी झालेल्या तरुणावरती पुढील उपचार चालू आहेत.

## हरित क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतरावजी नाईक यांच्या जयंती निमित्त दिंडाळा येथे वृक्षारोपण संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड | सय्यद रहीम रजा**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री शेतकऱ्यांचे नेते हरित क्रांतीचे प्रणेते स्व वसंतरावजी नाईक साहेब यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र कृषी दिवसाचे औचित्य साधून मौजे दिंडाळा येथे त्यांना अभिवादन करण्यात आले त्यांनी केलेल्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली व नाईक यांच्या पुतळा परिसरात वृक्षरोपण करून आदरांजली देण्यात आली. यावेळी भाजपा युवा नेतृत्व अतुल खंदारे भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष पवन मेंढे, कैलास पुरमसिंग राजेड सरपंच , गजानन रामदास जाधव उपरपंच, विठ्ठल पुलसिंग जाधव ग्रा.प.सदस्य,प्रकाश शिवलाल राठोड, अमरसिंग रामदास जाधव, भिकु राजूसिंग राठोड मा.पो.पाटील, साहेबराव शाहु जाधव मा.सरपंच, हरिचंद जयराम जाधव नायक, वीराम फकीरा जाधव मा.सरपंच, प्रल्हाद नारायण पवार, शंकर सिताराम राठोड, उत्तम जयराम जाधव, बाबुसिंग सवाई जाधव ग्रा.प.सदस बाळू सोमला पवार अध्यक्ष-शाळा समिती यावेळी समस्त दिंडाळा येथील समस्त गावकरी मंडळी मोठ्या प्रमाणात प्रामुख्याने उपस्थित होते.

## श्रीमती.मा.रजनी चक्रे यांना आशिया इंटरनॅशनल कल्चर रीसर्च यूनिव्हर्सीटी द्वारा डॉक्टरेट पदवी बहाल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**संभाजी नगर | प्रतिनिधी**



दि. २९ जुन २४ रोजी होसूर (बंगलूरू) येथे आशिया इंटरनँशनल कल्चर रीसर्च यूनिव्हसीटी तामिलनाडू द्वारा डॉक्टरेट पदवी समारंभ घेण्यात आला त्यात विविध मान्यवरच्या हस्ते पदवी बहाल करण्यात आली. त्यापैकी अकोला महाराष्ट्र येथिल मा. रजनी चक्रे सामाजिक व शैक्षणिक कार्य करित असतात तसेच समाजातील होतकरू व्यक्तिंना मदत करून त्यांना प्रेरित करण्याचे कार्य करित असतात. त्यांची ह्या समाज कार्याची नोंद लक्षात घेवुन त्यांना डॉक्टरेट पदवी होसुर हॉटेल हिल्स (बंगलूरू) येथे बहाल करण्यात आली. मा. रजनी चक्रे यांना दिलेल्या उच्च विभूषित पदवीचे श्रेय त्या आपल्या परीवारातील सदस्य व मोलाचे योगदान म्हणुन डॉ. संघर्ष बळीराम सावळे छ. संभाजी नगर यांना देऊ इच्छीतात. त्यांच्या ह्या गुणगौरव व सत्कार करिता सम्पूर्ण महाराष्ट्रातुन अभीनंदनचा वर्षाव होत आहे.तसेच पुढील वाटचालीस हार्दिक हार्दिक शुभेच्छा.

# पती व मुलगा मरण पावलेल्या आईला आर्थिक मदत करावी-अनिल कांबळे सावळेश्वरचे पोलीस पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड | सय्यद रहीम रजा**

आपणास कळविण्यात अत्यंत दुःख होते की दिनांक २६ जून २०२४ रोजी उमरखेड तालुक्यातील सावळेश्वर येथील नदीपात्रात दोन शाळकरी मुली व त्यांना वाचविण्यास गेलेल्या मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला.कुमारी कावेरी गौतम मुनेश्वर १५ ही विद्यार्थिनी आपल्या मामाच्या घरी सावळेश्वर येथे आली होती. तिची मैत्रीण कुमारी अवंतिका राहुल पाटील १४ ह्या दोघीजणी गावाच्या शेजारून वाहणाऱ्या पेनगंगा नदी पात्रात कपडे धुण्यासाठी गेल्या होत्या. कपडे धुऊन झाल्यावर आंघोळीसाठी पाण्यात उतरल्या परंतु त्यांना पाण्याचा अंदाज न आल्याने पाण्यात बुडू लागल्या. त्यांचा आरडाओरडा ऐकून चेतन देवानंद काळबांडे आणि शुभम काळबांडे हे दोन विद्यार्थी मदतीसाठी धावून आले.

आपल्याला वाचविण्यासाठी आलेल्या चेतनला कावेरी व अवंतिका यांनी मृत्यूच्या भीतीने घट्ट पकडले व त्यामुळे तिघांचाही पाण्यात बुडून मृत्यू झाला. मागील काही दिवसांपूर्वी चेतनच्या वडिलांचे साप चावल्याने दुर्दैवी निधन झाले. आपल्या छोट्याशा घरात दोघं माय लेकरं व एक अपंग बहीण आहे ते काम करून जीवन जगत होते. परंतु नियतीने आज मुलगाही हिरावला. त्यामुळे चेतन काळबांडेच्या कुटुंबाला आपल्या मदतीची गरज आहे. म्हणून आपल्या १००, २००, ३००, ४००, ५००, १००० रुपयाने चेतन काळबांडे परत येणार नाही पण एका आईला आपल्याशिवाय दुसरा कोणताही आधार नाही. चला आज या संकट समयी एका आईला मदत करून तिचा मुलगा होऊया. पती वारल्यावर एकमेव आधार मुलगा होता पण आज तो ही नाही. कसे जगणार ती माऊली..सोबतीला एक अपंग मुलगी आहे.दिलेल्या नंबरवर जेवढे शक्य होईल तेवढी आर्थिक मदत करावी आणि त्याचा स्क्रीनशॉट आपले धम्ममित्र साहेबराव इंगोले यांना पाठवावे ९६३७३४५७७२ असे नम्र आव्हान अनिल कांबळे फोन पे ७७५६८८९१९ सावळेश्वर गावाचे पोलीस पाटील यांनी केले आहे.

# कृषी दिन आणि वसंतराव नाईक जयंती वसंतराव नाईक महाविद्यालयात उत्साहात

## वसंतराव नाईक राज्याच्या हरितक्रांतीचे खरेखुरे प्रणेते-अधिष्ठाता डॉ.चंद्रकांत बाविस्कर यांचे प्रतिपादन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | भारत वानरे**

माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक हे खरोखरच महाराष्ट्र राज्याच्या हरितक्रांतीचे खरे खुरे प्रणेते होत. राज्याच्या विकासासाठी हरितक्रांतीचे महत्त्व ओळखून वसंतराव नाईक यांनी केलेले कार्य अमूल्य आहे, असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यास शाखेचे अधिष्ठाता चंद्रकांत बाविस्कर यांनी केले. येथील वसंतराव नाईक महाविद्यालयात माजी मुख्यमंत्री, हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी 'वसंतराव नाईक यांच्या कृषीविषयक धोरणांची कालातितता' या विषयावर प्रमुख अतिथी म्हणून व्याख्यान देताना डॉ. चंद्रकांत बाविस्कर बोलत होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शेखर घुंगरवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या कृषी दिन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. आर. राठोड हे होते. पुढे बोलताना अधिष्ठाता डॉ चंद्रकांत बाविस्कर यांनी आपल्या अभ्यासपूर्ण विवेचनात महाराष्ट्राच्या हरितक्रांतीचा सविस्तर आढावा घेतला. महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. साहेबराव शिंदे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तर अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. नागेश कांबळे यांनी आभार मानले.

कृषी दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या परिसरात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्रो. डॉ. रेणुका मोरे,सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ व्यंकटेश देशमुख, डॉ. प्रदीप बिरादार, प्रा. डॉ.जी. वेणुगोपाल, डॉ.अनिल गच्चे, डॉ.दिलिप पालिमकर,डॉ. संतोष शिंदे, डॉ. गणेश लिंगमपल्ले, डॉ.सुनिता गरुड, कार्यालयीन अधीक्षक श्री. आर. डी. राठोड, डॉ.संजय गिरे,डॉ.उत्तम कानवटे, डॉ.आर. एम. कागणे, डॉ. साहेबराव मोरे, डॉ.विजयकुमार मोरे,प्रा. पी. बी. चव्हाण, प्रा.जायदे मॅडम, प्रा.नंदिनी सुधळकर,प्रा.माधव मुस्तापुरे, प्रा. शेख,प्रा.कोतवाल,प्रा.कपील हिंगोले,प्रा.शशीकांत हाटकर,डॉ. लालबा खरात, डॉ.शोभा वाळुक्कर, डॉ.ललिता आय्या, प्रा.नितीन मुंडलोड,प्रा.भुमरे,डॉ. सरोदे यांसह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.



# एक हजार वृक्ष लागवड करून कृषी दिन साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

हरित क्रांतीचे प्रणेते,महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची १११ वी जयंती सोमवारी, दि.१ जुलै रोजी कृषी दिन म्हणून साजरा करण्यात आली .यावेळी तालुका कृषी अधिकारी कंधार तसेच पंचायत समिती कंधार यांच्या संयुक्त विद्यमाने वसंतराव नाईक सभागृह पंचायत समिती कार्यालय कंधार येथे कृषी दिनाचे आयोजन करण्यात आले होते,

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी तथा प्रशासक पंचायत समिती कंधार महेश पाटील होते तर प्रमुख मार्गदर्शक डॉ.संतोष चव्हाण शास्त्रज्ञ कृषी विज्ञान केंद्र सगरोळी हे उपस्थित होते.हा कार्यक्रम वसंतराव नाईक सभागृहात आयोजित करण्यात आला होता,



कंधार तालुक्यातील प्रगतिशील शेतकरी कृषी विभागातील सर्व अधिकारी कर्मचारी पंचायत समितीतील सर्व अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती होती, कृषी दिनानिमित्त सर्व कर्मचाऱ्यांना या आर्थिक वर्षांमध्ये शेतकऱ्यांना आर्थिक स्थर वाढवण्याच्या उद्देशाने कृषी विभागाच्या वेगवेगळ्या योजना प्रभावीपणे राबवून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ कसा देता येईल व आर्थिक वर्षामध्ये फळबाग लागवड शेततळे जमीन आरोग्य सुधारण्यासाठी सेंद्रिय शेती इत्यादी विषयावर भर देण्यासाठी निश्चय केला जाणार आहे.

या कार्यक्रमा वेळी डॉ.चव्हाण यांनी वेगवेगळ्या फळ पिकांच्या लागवडीबद्दल सखोल असे मार्गदर्शन केले तसेच महेश पाटील गटविकास अधिकारी कंधार यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री संभाजी वडजे कृषी सहाय्यक यांनी केले .

तालुका कृषी अधिकारी कंधार वतीने कंधार तालुक्यातील गऊळ येथे माणिका बळीराम गिरे यांच्या शेतात एक हजार केशर आंब्याची लागवड करण्यात आली तसेच मधुकर कागणे भोजूचीवाडी यांच्या शेतावर शंभर केशर आंबा वृक्ष लागवड करून कृषी दिन साजरा करण्यात आला .

यावेळी विठ्ठल गीते तालुका कृषी अधिकारी कंधार,माधव गुट्टे मंडळ कृषी अधिकारी पेठवडज,जीवन कळणे कृषी सहाय्यक,सतीश वाघमारे संजय माळी, सय्यद सरताज,संजय गुटे,भूषण पेटकर,हेमंत थोटे नामदेव कुंभारे व शेतकरीप्रभाकर व्यवहारे,विष्णू पाटील इंगोले,धोंडीबा राहेरकर,ओमप्रकाश पवळे, माणिक बळीराम गिरे मधुकर कागणे इत्यादी उपस्थित होते .

# पशुसंवर्धन खात्यातील डॉ.सुनिल गदादे आणि डॉ.साबळे यांना पदोन्नती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

पशुसंवर्धन खात्यामध्ये कार्यरत असणारे डॉ.सुनिल गदादे व डॉ.विष्णू साबळे यांना सहाय्यक पशुधन विकास अधिकारी या पदावर पदोन्नती मिळाली असून अनुक्रमे पशुवैद्यकीय दवाखाना धानोरा आणि पशुवैद्यकीय दवाखाना धामणगाव या ठिकाणी पदस्थापना मिळाली असून त्यांच्या या पदोन्नतीमुळे त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

दोघेही पशुसंवर्धन खात्यामध्ये वीस वर्षापासून





कार्यरत असून चांगली सेवा देत आहेत.विविध योजनेच्या माध्यमातून पशुपालकांना लाभ मिळवून देण्याचे काम तसेच लंपी सारख्या साथ रोगामध्ये चांगल्या पद्धतीचे काम त्यांनी केलेले होते.

# दीनदयाल विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात शाळा प्रवेशोत्सव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देऊळगाव राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा संचालित दीनदयाल विद्यालय व कनिष्ठ कला आणि विज्ञान महाविद्यालय दे.राजा जि बुलढाणा येथे आज सोमवार दिनांक ०१ जूलै रोजी शैक्षणिक सत्र २०२४-२५ चा पहिला दिवस असल्याने विद्यार्थ्यांना आनंदमयी शाळा आणि शिक्षण याचा अनुभव यावा या हेतूने विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन आणि औक्षण करून स्वागत करण्यात आले सोबतच महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री लोकनायक स्व.वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या प्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य श्री.एस.बी.गारडे




सर,पर्यवेक्षक श्री. एस. एन. व्यास सर, प्राध्यापक श्री. संदीप डोईफोडे, जेष्ठ शिक्षक श्री. एस. आर. जायभाये, श्री. पी. बी. ठाकूर सर आदी उपस्थित होते. प्रमुख वक्ते म्हणून बोलत असताना प्रा.श्री. संदीपजी डोईफोडे यांनी स्व. वसंतराव नाईक साहेब यांचे महाराष्ट्र राज्याच्या जडणघडणीत महत्वाचे योगदान असून त्यांनी राज्याचे कृषीमंत्री आणि मुख्यमंत्री म्हणुन केलेले कार्य उल्लेखनीय आहे असे प्रतिपादन केले. तसेच प्राचार्य श्री.एस.बी. गारडे सर यांनी विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक - प्राध्यापिका तसेच शिक्षक - शिक्षिका यांना नवीन शैक्षणिक सत्र २०२४ - २५ साठी शुभेछा दिल्या देऊन सविस्तर मार्गदर्शन केले. या संपुर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभारप्रदर्शन शारीरिक शिक्षक श्री.आर.एल.राठोड सर यांनी केले.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्ट पर्यंत

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत निर्णय

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्ट पर्यंत वाढविण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयाची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत निवेदनाद्वारे दिली.

विधानभवनातील मुख्यमंत्र्यांच्या समिती कक्षात झालेल्या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, मुख्य सचिव सुजाता सौनिक, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार यावेळी उपस्थित होते.

योजनेसाठी नाव नोंदणी, अर्ज करणे आदी कामांसाठी होणारी गर्दी लक्षात घेऊन अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत वाढविण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले. ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करणाऱ्या महिलांना १




जुलैपासून लाभ देण्यात येईल असा महत्वपूर्ण निर्णय घेतानाच योजना सुलभ आणि सुटसुटीतपणे राबविण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी विभागाला दिले.

अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देतानाच योजनेसाठी एकर शेतीची अट वगळण्याचा, लाभार्थी महिलांचा वयोगट २१ ते ६० वर्ष वयोगट ऐवजी २१ ते ६५ वर्ष वयोगट करण्याचा, परराज्यात जन्म झालेल्या महिलांनी महाराष्ट्रातील आधिवास असणाऱ्या पुरुषाबरोबर विवाह केला असेल तर अशा बाबतीत त्यांच्या पतीचा जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, आधिवास प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल, असा निर्णय यावेळी घेण्यात आला. अडीच लाख रुपये उत्पन्न दाखला उपलब्ध नसेल तर ज्या कुटुंबाकडे पिवळे व केशरी रेशनकार्ड उपलब्ध असेल त्यांना उत्पन्नाच्या दाखला प्रमाणपत्रातून सुट देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. या योजनेत कुटुंबातील एका पात्र अविवाहित महिलेला सुध्दा या योजनेचा लाभ देण्यात येणार असून योजनेमध्ये सुधारणा केलेल्या निर्णयांचा शासन निर्णय तातडीने जाहिर करण्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

# कार्यालयीन कामे वेळेत न करणाऱ्या कर्मचाऱ्यावर दप्तरदिरंगाईची कार्यवाही करा

## तहसीलदार भोकरदन यांच्याकडे आम आदमी पार्टीची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शेख जफर । भोकरदन**

आम आदमी पार्टीच्या वतीने सर्व कार्यकर्त्यांनी तहसीलदार भोकरदन यांना निवेदन दिले असून त्या निवेदनामध्ये तहसील भोकरदन कार्यालयामध्ये नागरिकांच्या प्रकरणावर वेळेत निर्णय होत नाहीत याबाबत तहसिलदार भोकरदन यांनी प्रत्यक्ष लक्ष घालून विभाग प्रमुखांवर दप्तरदिरंगाईची कार्यवाही करावी अशी मागणी करण्यात आली आहे.असे बोरशे गुरुजींनी प्रसारमाध्यमांशी बोलतांना सांगितले आहे.



याबाबत माननीय तहसीलदार तहसील कार्यालय भोकरदन तालुका भोकरदन जिल्हा जालना यांना खालीलप्रमाणे निवेदन देण्यात आलेले आहे.तहसिल कार्यालयात नागरिकांच्या पडून असलेल्या प्रकरणांचा त्वरित निपटारा करणे व निपटारा न करणार्या विभाग प्रमुखांवर दप्तर दिरंगाईची कार्यवाही करावी असे निवेदनात म्हटले आहे. जन्म नोंदणी प्रमाणपत्रासाठी अनेकांच्या फाईल पडून आहेत. तसेच संजय गांधी निराधार योजना नांगरिकांची पडुन असलेली कामे व इतर योजनांच्या फाईल पडून आहेत.त्या फाईलवर तात्काळ निर्णय व्हावेत . नागरिकांना वेठीस धरण्यात येऊ नये गरीब नागरिक आपल्या कार्यालयामध्ये खेटा घालतात.कामधंदा सोडून आणि भाडे खर्च करून त्यांना यावे लागते. कार्यालयीन कर्मचारी नांगरीकांसोबत सामंजस्याची व सहकार्याची भुमीका बजावत नाहीत.या सर्व गोष्टी लक्षात घेऊन अशा फाईल तात्काळ निपटारा करण्यासाठी मार्ग काढावा . आवक जावक नोंदी तपासुन त्याप्रमाणे वेळेत नागरीकांची कामे न करणार्या विभागप्रमुखांवर दप्तर दिरंगाईची कार्यवाही करण्यात यावी. आपण जातीने लक्ष घालुन एका आठवड्यात पडुन असलेल्या प्रकरणा बाबत निर्णय हावा अन्यथा आम आदमी पार्टिच्या वतीने तहसिल कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल.याची सर्व जबाबदारी प्रशासनाची राहील.सकारात्मक सहकार्याची अपेक्षा. असा इशारा देण्यात आलेला आहे.यावेळी बोरशे गुरुजी,जनार्दन सोळंके,महजाद इस्लाम खान,श्री फारुख भाई , करीमलाला,विकास जाधव,केशव जंजाळ,पार्टिचे कार्यकर्ते व नागरीक मोठ्या संख्येने हजर होते.

# आर्यन इंगळे यांचा सेवापूर्ति सत्कार सोहळा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शेख जफर । भोकरदन**

तालुक्यातील दगडवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यरत श्री आर्यन इंगळे यांना ३८ वर्षांच्या सेवा पूर्ती निमित्त शाळा,गावकरी,नातेवाईक तथा तालुक्यातील शिक्षकांच्या वतीने आयोजित विशेष कार्यक्रमात सपत्नीक गौरविण्यात आले.या भव्य कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ.आशाताई पांडे तर प्रमुख पाहुणे म्हणून गट शिक्षणाधिकारी दिलीप शहागडकर यांची प्रमुख उपस्थिती होती.व्यासपिठावर जिल्हा नेते अझहर पठाण,प्रदीप इंगळे,चेअरमन संतोष इंगळे,आर. एच. सोनवणे,गणेश सोळुंके,सुनील वानखेडे,व्ही वाय. गिरनारे,जे.डी.पालकर यांची प्रमुख उपस्थिती होती.श्री.आर्यन इंगळे यांनी सेवाकाळात केलेल्या कार्याचा गौरव करताना अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.त्यांच्या काळात दगडवाडी शाळेने



मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळेच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला,याशिवाय ते कार्यरत असलेल्या देहेड जिल्हा परिषद शाळेत यूनिसेफ ने राबवलेल्या ढाल प्रकल्पात जगातील १३७ देशांच्या स्पर्धेत शाळेने १७ वा क्रमांक मिळवून लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नाव नोंदवले होते विविध क्रीडा,सांस्कृतिक स्पर्धा असो वा नावीन्यपूर्ण उपक्रम,प्रत्येक वेळी आर्यन इंगळे यांनी विशेष करून दाखवले असल्याचे उपस्थितांनी बोलून दाखवले.याप्रसंगी पुंडलिक सोनुने यांनी प्रास्ताविक तर के.डी .वाघ यांनी त्यांचा सविस्तर परिचय करून दिला. गोपाल काटोले, व्हीं. वाय गिरनारे,अश्फाक शेख,डॉ.समाधान इंगळे यांची याप्रसंगी समायोचीत भाषणे झाली.कार्यक्रमाच्या अध्यक्ष सौ आशाताई पांडे यांनी अतिशय समर्पक व प्रेरणादायी मनोगत व्यक्त करून नव्या पिढीतील शिक्षकांनी आर्यन इंगळे सर यांचा आदर्श घेऊन आपले शैक्षणिक कार्य करण्याचे आवाहन केले.या कार्यक्रमात त्यांना विशेष भेटवस्तू देऊन सपत्नीक गौरविण्यात आले.आर्यन इंगळे यांनी शाळेसाठी ध्वनी क्षेपक यंत्र भेट दिले.कार्यक्रमासाठी केंद्रातील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमासाठी श्रीमती जिजा वाघ यांनी निवेदन केले.यावेळी नंदकुमार गिऱ्हे उपसरपंच दगडवाडी, चंद्रकांत गायके शाखा अभियंता वैजापूर, संदिप सिरसाठ,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष शिवाजी पांडे , उपाध्यक्ष विष्णू सोनुने शालेय समिती सदस्य,जुई फाउंडेशन आसई चे सर्व सदस्य उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री.विठ्ठल घायाळ,भास्कर कढवणे, वायाळ सर,येवले सर,श्रीमती.दांडगे,पांडे मॅडम, यांनी परिश्रम घेतले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904